आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२१ जानेवारी २०२५ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- दावोसमध्ये सुरू असलेल्या जागतिक आर्थिक मंचाच्या बैठकीत राज्यात गुंतवणुकीसाठी साडे ३ लाख कोटी रुपयांचे करार, २४ हजारांहून अधिक रोजगार निर्मिती
- छत्तीसगड आणि ओडिशामध्ये सुरक्षा दलांच्या कारवाईत २३ नक्षलवादी ठार, १ कोटी रुपयांचं बक्षिस असलेल्या चलपतीचाही समावेश
- ट्रम्प यांनी घेतलेल्या निर्णयांच्या धडाक्यानंतर देशातले शेअर बाजार कोसळले

**आणि**

- ज्येष्ठ कीर्तनकार डॉक्टर किसन महाराज साखरे यांच्या पार्थिवावर आळंदीत अंत्यसंस्कार

**<><><><><>**

दावोस इथं सुरू असलेल्या जागतिक गुंतवणूक परिषदेत महाराष्ट्रातर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज एकंदर ३ लाख ५१ हजार कोटी रुपयांच्या विविध सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. जेएसडब्ल्यू समूहासोबत झालेल्या ३ लाख कोटी रुपयांच्या सामंजस्य करारामुळे राज्यातल्या उद्योगांना मोठी चालना मिळणार आहे. या कराराअंतर्गत गडचिरोलीत २५ मिलियन टन क्षमतेचा अत्याधुनिक पर्यावरणस्नेही पोलाद प्रकल्प उभारला जाईल. छत्रपती संभाजीनगरमध्ये ग्रीन मोबिलिटी, विद्युत बस, ट्रक आणि परवडण्याजोग्या इलेक्ट्रिक गाड्या, पेट्रोल पंपांवर वेगाने चार्जिंगची सुविधा, राज्याच्या ट्रान्समिशन नेटवर्कचं पुनर्मूल्यांकन होणार आहे. याअंतर्गत विविध क्षेत्रांमध्ये १० हजार रोजगार निर्माण होतील.

कल्याणी उद्योगसमूह आणि महाराष्ट्र सरकार यांच्यात संरक्षण, पोलाद आणि इलेक्ट्रॉनिक वाहनांच्या क्षेत्रात झालेल्या करारान्वये ५ हजार २५० कोटी रुपयांची गुंतवणूक आणि गडचिरोलीत चार हजारांपेक्षा जास्त रोजगार निर्माण होणार आहेत.

रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरसोबत संरक्षण क्षेत्रात १६ हजार ५०० कोटी रुपयांचा सामंजस्य करार झाला. याअंतर्गत रत्नागिरीत २ हजार ४५० रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. तर बालासोर ॲलॉयस या कंपनीसोबत पोलाद आणि धातू या क्षेत्रांमध्ये झालेल्या १७ हजार कोटी रुपयांच्या सामंजस्य करारामुळे रायगड जिल्ह्यातल्या दिघी बंदर परिसरात ३ हजार २०० रोजगार तयार होणार आहेत.

विराज प्रोफाइल्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीसोबतही पोलाद आणि धातू क्षेत्रात १२ हजार कोटी रुपयांचा सामंजस्य करार झाला. यामुळे पालघरमध्ये ३ हजार ५०० जणांना रोजगार मिळेल. तसंच एबी इनबेव्ह या जगातल्या सर्वात मोठ्या ब्रुअरीसोबतही महाराष्ट्र सरकारने छत्रपती संभाजीनगरमध्ये २५० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसाठीचा सामंजस्य करार झाला.

याव्यतिरिक्त मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज जागतिक आर्थिक मंचाच्या कार्यक्रमांअंतर्गत विविध कंपन्यांच्या पदाधिकाऱ्यांचीही भेट घेतली आणि महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यासंदर्भात त्यांच्याशी चर्चा केली. एएमसीईए अँड इंटरनॅशनल बेव्हरेजेस कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी यूजीन विलेमसन आणि पेप्सिकोचे स्टीफन केहो यांचीही मुख्यमंत्र्यांनी भेट घेतली. पेप्सिकोला नाशिकमध्ये मूल्यसाखळी निर्माण करून पुढे राज्यभर त्यांच्या कामाचा विस्तार करायचा असून महाराष्ट्र त्यांना शक्य ते सर्व सहाय्य करेल, असं आश्वासन फडणवीस यांनी दिलं. याशिवाय लुई ड्रेफस, मास्टरकार्ड, कॉग्निझंट, कार्ल्सबर्ग इत्यादी कंपन्यांच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली.

<><><><><>

छत्तीसगडमधल्या गरियाबंद जिल्ह्यात आणि ओदिशामधल्या नुआपाडा जिल्ह्यात सुरक्षा दलाच्या कारवाईत २३ नक्षलवादी मारले गेले. त्यात नक्षलवाद्यांच्या केंद्रीय समितीचा सदस्य जयराम उर्फ चलपती याचाही समावेश आहे. त्याच्यावर १ कोटी रुपयांचं बक्षीस होतं. या कारवाईत ठार झालेल्या दोन महिला नक्षलवाद्यांचे मृतदेह काल,  तर १२ नक्षलवाद्यांचे मृतदेह आज ताब्यात घेण्यात आले. सुरक्षा दलाने घटनास्थळावरून एका रायफलसह मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा जप्त केला आहे. पोलीस आज या परिसरात व्यापक शोधमोहीम राबवत आहेत.

नक्षलमुक्त भारत अभियानाच्या दृष्टीने सुरक्षा दलाचं हे मोठं यश असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. नक्षलवाद आपल्या शेवटच्या घटका मोजत आहे, असं शहा म्हणाले.

<><><><><>

पुणे शहर परिसरात प्रत्येक पोलीस ठाण्यांतर्गत वास्तव्य करणाऱ्या परप्रांतीय मजुरांची माहिती संकलित करून बेकायदा वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी घुसखोरांवर कारवाई करण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले आहेत. पुणे स्टेशन आणि महर्षि परिसरातून दोन जणांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. महर्षीनगर भागात वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकाकडून परदेशी चलनही जप्त करण्यात आलं.

<><><><><>

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत आज राजभवनात मणिपूर, मेघालय आणि त्रिपुरा या तीन राज्यांचा स्थापना दिवस साजरा करण्यात आला. 'एक भारत श्रेष्ठ भारत' कार्यक्रमांतर्गत आयोजित राज्य स्थापना दिवस साजरे केल्यामुळे त्या त्या राज्यांची भाषा, लोककला, जीवनशैली यांचा सर्वांना परिचय होतोय, तसंच राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ होत असल्याचं राज्यपालांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

अमेरिकेचे नवे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नव्या धोरणांचे पडसाद आज देशातल्या शेअर बाजारांवर उमटले. जागतिक व्यापारासाठी ब्रिक्स राष्ट्रांना लक्ष्य करून अमेरिकन डॉलवरचं अवलंबित्व कमी करणाऱ्या देशांवर १०० टक्के कर लादण्याच्या ट्रम्प यांच्या धोरणामुळे भारताच्या दोन्ही शेअर बाजारांमध्ये तीव्र घसरण पाहायला मिळाली. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज दिवसअखेर १ हजार २३५ अंकांची घसरण झाली, आणि तो ७५ हजार ८३८ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३२० अंकांची घसरण नोंदवत २३ हजार २४ अंकांवर बंद झाला. निफ्टी आज दिवसभरात २३ हजारांखाली पोहोचला होता. या घसरणीमुळे गुतंवणूकदारांचं ७ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त नुकसान झालं आहे.

**<><><><><>**

शेअर बाजारातल्या ग्रे मार्केट ट्रेडिंगला आळा घालण्याच्या उद्देशाने सेबी एक नवी प्रणाली आणण्याची योजना आखत आहे अशी माहिती सेबीच्या अध्यक्षा माधवी पुरी बुच यांनी आज दिली. असोसिएशन ऑफ इन्वेस्टमेंट बँकर्स ऑफ इंडियाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. सेबीच्या या प्रणालीद्वारे

शेअर गुंतवणूकदारांना आयपीओचं वाटप होताच त्यांना शेअर विकता येऊ शकतील. आयपीओ वाटपानंतर किंवा प्री-लिस्टिंग टप्प्यानंतर जर गुंतवणूकदारांना त्यांचे शेअर्स विकायचे असतील तर त्यांना संधी देणं गरजेचं असल्याचं त्या म्हणाल्या.

**<><><><><>**

ज्येष्ठ कीर्तनकार डॉक्टर किसन महाराज साखरे यांच्या पार्थिवावर आज आळंदी इथं अंत्यसंस्कार झाले. काल रात्री त्यांचं पुण्यात निधन झालं होतं. ते ८९ वर्षांचे होते. साखरे महाराज यांचा शिष्य परिवार देशात, तसंच परदेशातही आहे. राज्य सरकारनं २०१८ या वर्षीचा ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केलं होतं.

किसन महाराज साखरे यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दुःख व्यक्त केलं आहे. साखरे यांची कार्यसाधना पुढच्या अनेक पिढ्यांसाठी तेजोमय राहील, अशा शब्दात फडनवीस यांनी त्यांना आदरांजली वाहिली आहे. तर साखरे महाराज यांच्या निधनानं अध्यात्मिक क्षेत्रातला ज्ञानतारा निखळला आहे, असं पवार यांनी आदरांजली व्यक्त करताना म्हटलं आहे.

**<><><><><>**

चाकू हल्ल्यात जखमी झालेला अभिनेता सैफ अली खान याला उपचारांनंतर रुग्णालयातून घरी सोडलं आहे. १६ जानेवारी रोजी पहाटे सैफ अली खान याच्यावर वांद्रे इथल्या राहत्या घरी चाकू हल्ला झाला होता. हल्लेखोराने त्याच्यावर सहा वार केले होते. त्यानंतर त्याला उपचारांसाठी रुग्णालयात दाखल

केलं होतं. डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करून त्याच्या पाठीत घुसलेला चाकुचा तुकडा बाहेर काढला होता.

<><><><><>

जातवैधता प्रमाणपत्र सादर न केल्यानं बीड जिल्ह्यातील १३ सरपंच आणि ४१८ सदस्यांचं सदस्यत्व रद्द करण्याचा निर्णय जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रवर्गासाठीच्या राखीव जागांवरून निवडून आलेल्या सदस्यांना बारा महिन्यांच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर करणं आवश्यक असतं. मात्र बीड जिल्ह्यातल्या आष्टी, अंबाजोगाई, वडवणी, पाटोदा, माजलगाव, केज आणि धारूर तालुक्यातल्या १३ सरपंच आणि ४१८ सदस्यांनी प्रमाणपत्र सादर केलं नाही. त्यामुळे त्यांचं सदस्यत्व रद्द करण्यात आलं आहे.

<><><><><>

छत्रपती संभाजीनगर इथले शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शहरप्रमुख विश्वनाथ स्वामी यांनी अनेक पदाधिकारी तसंच शिवसैनिकांसोबत आज भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत मुंबईत पक्ष कार्यालयात हा प्रवेश सोहळा पार पडला. मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक  ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ झाली आहे. राज्यात उर्वरित ठिकाणी रात्रीचं तापमान सरासरीच्या जवळपास होतं. येत्या दोन दिवसात हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.